☏- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष ☏ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

जा.क्रं./ प्रेस नोट/ /पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 / दिनांक : 14/08/2025

# 15 ऑगष्ट स्वातंत्र्य दिनी "स्ट्रिट सेफ्टी निर्भया" रॅलीत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा मा. पोलीस अधीक्षक नांदेड यांचे आवाहन...

दिनांक 15 ऑगष्ट, 2025 रोजी सकाळी 10.30 वा. मा. पालक मंत्री, नांदेड जिल्हा यांचे उपस्थितीत कोनाळे क्लासेस, क्रिडा संकुल स्टेडियम जवळ, गोकुळनगर नांदेड येथे विद्यार्थी, महिला व मुलींचे सुरक्षेच्या दृष्टीकोणातुन **"स्ट्रीट सेफ्टी निर्भया रॅलीचे"** आयोजन करण्यात आले आहे. सदरची रॅली ही कोनाळे–भार्गव क्लासेस जवळुन क्रिडा संकुल स्टेडियम रोडने सुरूवात होवुन कै. शंकरराव चव्हाण स्मृती चौकातील तिरंगा ध्वजाजवळ समारोप होणार आहे. सदर रॅलीमध्ये हजार पेक्षा अधिक विद्यार्थी, कोचींग क्लासेस संचालक, शिक्षक, महाविद्यालयाचे प्राचार्य व हॉस्टेल संचालक, मालक यांचेशी विद्यार्थ्यांच्या, मुलींच्या व महिलांच्या सुरक्षीततेच्या दृष्टीकोणातुन संवाद साधला जाणार आहे.

तरी सदर रॅलीस महाविद्यालयाच्या, शाळेच्या जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवुन **"स्ट्रीट सेफ्टी निर्भया रॅली "** या जनजागृतीपर रॅलीची शोभा वाढवावी असे **मा.श्री अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड** यांनी आवाहन केले आहे.

**जनसंपर्क अधिकारी,**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड